# पत्रात्मक साहित्याचे स्वरुप

**डॉ.राजेंद्र ठाकरे**
सहयोगी प्राध्यापक,
एस.एम.जोशी महाविद्यालय,
हडपसर, जि.पुणे.

**प्रमिला प्रल्हाद देहाडे**
पद्व्युत्तर मराठी अध्ययन आणि संशोधन केंद्र,
रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालय,
श्रीरामपूर, जि.अहमदनगर

## प्रास्ताविक

मराठी साहित्यामध्ये पत्रात्मक वाङ्मय हा एक नवीन प्रवाह उदयास आला आहे. कथा, कविता, कादंबरी, ललित लेख, प्रवासवर्णन इत्यादी साहित्य पत्ररुप लिहिले गेले आहे. काही विविध क्षेत्रातील व्यक्तींची, ऐतिहासिक पुरुषांची पत्रे ही संग्रहरुपाने प्रकाशित करण्यात आली आहेत. त्यातूनच मराठी ललित गद्यात पत्रात्मक वाङ्मय प्रकार रुढ झाला आहे. श्यामकांताची पत्रे, विलायतची डाक, गांधीजींची पत्रे, अरविंदांची पत्रे, इंदिरेस पत्र, कमलपत्र, संदरपत्रे, टाटा ची पत्रे इत्यादी पत्रसंग्रह वाङ्मयीनदृष्ट्या महत्त्वाचे आहेत. पत्रात्मक साहित्यात निर्माण होणाऱ्या कलाकृतीचे स्वरुप पत्रबद्ध असते. पत्राच्या तंत्राचा अवलंब त्या ठिकाणी केलेला असतो. संपूर्ण साहित्यकृती पत्र रुपातच अविष्कृत होते. त्या कथा, कादंबरी, कवितेची सुरुवात व अखेर ही मायन्यानेच होते. त्यातील भाषेचे स्वरुप हे पत्रातील भाषेप्रमाणेच असते. मात्र रोजच्या व्यवहारातील पत्रापेक्षा ही पत्रे दीर्घ स्वरुपाची असतात. पत्रात्मक साहित्य हा एक आत्मनिवेदन पर अविष्कार असतो. या प्रकारात लेखक एकच वाचक गृहीत धरुन आत्मनिवेदन करीत असतो. एक वा अनेक पत्रांचा पत्रव्यवहार येथे साहित्यकृतीचे रुप धारण करतो. पत्रात्मक साहित्यातील कोणत्याही कलाकृतीने 'पत्र' या रुपबंधाचे रुप धारण केलेले असते. त्यातील पात्र वाचकांशी वैयक्तिक पातळीवर संवाद साधत आहे, असा भास निर्माण केलेला असतो. अशा पत्रातून पात्रांचे विविध भाव-भावनांच्या प्रकटीकरणाबरोबरच प्रसंगचित्रण, व्यक्तिचित्रण, नाट्यात्मकथन, काही वेळा संवाद इत्यादी घटक ही समाविष्ट झालेले असतात. संपूर्ण साहित्य कृतीचे कथानक पत्राच्या माध्यमातूनच आकारत जाते.

- पत्रात्मक साहित्याची पूर्वपरंपरा

व्यक्ती-व्यक्तीमधील (दोन किंवा अनेक व्यक्तीमधील) ऋणनुबंध बळकट करण्याचा, खुशाली कळविण्याचा, भाव-भावना व्यक्त करण्याच्या हेतूने निर्माण झालेले पत्र वाङ्मय हे पुराणापासून ते आजतागायत अस्तित्वात असलेले आढळते. प्रेम व्यक्त करण्यासाठी, कधी विचाराच्या प्रकटीकरणासाठी, तत्वज्ञान सांगण्यासाठी, कधी आठवणी व्यक्त करण्यासाठी तर कधी मन मोकळे करण्यासाठी पत्रलेखन केले जाते. त्यातून प्रेमाचे, मैत्रीचे नातेसंबंध जपले जातात आणि त्यातूनच अलिकडच्या काळात पत्रात्मक कथा, कादंबरी, कविता, लेख, प्रवासवर्णने इत्यादीचे लेखन करण्यात येऊ लागले आणि पत्रात्मक साहित्याचा उदय झाला. त्याचबरोबर काही पत्रात्मक संग्रहाचेही संपादन करण्यात आले. ते पुढीलप्रमाणे -

1. संताची पत्रे

पत्रात्मक वाङ्मयाला जरी फार प्राचीन परंपरा लाभली असली तरी, पत्रलेखनाची कला ही सहजसाध्य असली तरीही पत्रात्मक तंत्राचा वापर करुन कथा, कादंबऱ्या फार उशिरा लिहिल्या गेल्या आहेत. पत्रात्मक वाङ्मयाचा उदय बऱ्याच उशिरा झाल्याचे दिसून येतो. पहिला पत्रात्मक ग्रंथ म्हणून हेमाडपंडितांचा 'लेखनकल्पतरु' चा उल्लेख करावा लागतो. या ग्रंथात पत्रलेखनासंबंधीची माहिती देण्यात आली आहे. तसेच मराठीतील पहिला पत्रात्मक काव्यमय ग्रंथ म्हणून ज्ञानेश्वरांचा 'चांगदेव पासष्टी' चा उल्लेख करावा लागतो. चांगदेवपासष्टी म्हणजेच चांगदेवांना ज्ञानेश्वरांनी पाठविलेल्या कोऱ्या पत्राचे उत्तर होय. यातील पासष्ट ओव्या मधून ज्ञानेश्वरीतील तत्वज्ञान संक्षेपाने आले आहे. त्याचप्रमाणे पत्रबद्ध तंत्राचा अवलंब संत एकनाथांनी करुन 'अर्ज दस्त', 'कऊलपत्रे' इत्यादी सारखी प्रकरणे लिहिली व त्याद्वारे आपले तत्वज्ञान मांडले. इ.स. 1715 मध्ये राज्य प्रशासनाविषयक माहिती सांगणारा 'आज्ञापत्र' हा ग्रंथ लिहिला गेला. हा ग्रंथ एकूण 9 प्रकरणांत विभागलेला असून त्यातील प्रत्येक प्रकरण म्हणजे एक एक पत्रच आहे.

अशा स्वरुपात आरंभीच्या कालखंडात पत्रात्मक साहित्य लिहिले गेले आहे. या साहित्याची निर्मिती प्रासंगिक स्वरुपाची असून त्यामागे निरनिराळे हेतू असल्याचे लक्षात येते. हे साहित्य तत्वज्ञान सांगण्याच्या व माहिती देण्याच्या हेतूने निर्माण झाले आहे. परंतु या पत्रबद्ध वाङ्मयाचे प्रमाण आरंभी त्रोटक असल्याचे दिसून येते.

2. हस्तलिखित

प्राचीन काळी म्हणजे 1801 पर्यंत जे-जे वाङ्मय निर्माण झाले ते हस्तलिखित वाङ्मय म्हणून ओळखल जाऊ लागले. पूर्वी वेद पाठांतर केले जात. त्यानंतर पासोडी, चामडे, धातु, लाकूड, दगड इत्यादींवर हस्तलिखित वाङ्मय कोरले गेले. यामध्ये राजे-रजवाडे यांचा पत्रव्यवहार, धार्मिक ग्रंथ, चरित्र, बखरी, करार, मदार, बातमीपत्रे, शोकपत्रे, करीणे, बाके इत्यादींचा समावेश करावा लागेल. मात्र त्याचवेळी विल्यम कॅरे हा मिशनरी पंडीत धर्मप्रसारासाठी हिंदुस्थानात आला. कलकत्त्यामध्ये त्याने अध्ययन-अध्यापनाचे काम सुरु केले. त्याने 1805 मध्ये पहिले मुद्रित पुस्तक तयार केले. त्याचबरोबर हॉल, नॉट ह्या पंडीतांनीही मराठी शिकून, पोथ्यामधील अक्षरे कापून त्याचा वळणाचा सराव सुरु केला. मोडी व देवनागरी लिपी मधील टाईप पाहून कालांतराने मुद्रण सुरु केले.

अशा प्रकारे मराठी वाङ्मय ग्रंथरुपाने लिहिले जाऊ लागले. पूर्वी धूळपाटी होती. ती पेशवाईच्या काळातही होती, तसेच या धुळपाटीचा उल्लेख ज्ञानेश्वरीमध्येही पाहायला मिळतो. 'पाटिया वरिले आखिरे, जैसी पुसता येती करे' पण युरोपियांमुळे मुद्रणाची जोड मिळाली व हस्तलिखित वाङ्मय ग्रंथरुपात मुद्रित होऊ लागले आणि हळूहळू शिक्षणाची घडी बसू लागली. इंग्रजामुळे मुद्रण कला अस्तित्वात आली व तिचा प्रसारही झला.

3. मराठी रिसायत कालीन पत्रव्यवहार

मराठे कालीन राज्यात ही शहाजीराजांचा पत्रव्यवहार झालेला 'मराठी रियासती' मध्ये येतो. त्यामध्ये शहाजी राजाचा ऐतिहासिक पत्रव्यवहार दिसून येतो. शहाजींचा उत्तरायुक्रम, आदिशहाला बाणेदार पत्र (1650-1657) तसेच सन 1660 नंतर कर्नाटकात आदिलशहा व कुतुबशहा यांचे जे व्यवहार घडले आणि त्यातही शहाजी व श्रीरंगराय यांचा संबंध पूर्वी इतकाच येतो. शहाजी राजांच्या कर्तृत्वामुळे आदिलशहाने शहाजीस आपला विश्वासू मानले. सन 1652-54 च्या दरम्यान शहाजीच्या नावाने सुटलेले सनदापत्रे महाराष्ट्रातील आहेत. या सर्वांवरुन दोन्ही क्षेत्रावर लक्ष ठेवून शहाजीराजे आपल्या पुत्रास प्रोत्साहन देत होता असे आढळते. शहाजी राजाने जे आदिलशहास वैतागून पत्र लिहिले आहे ते भोसल्यांची

मनोरचना समजण्यास उपयुक्त ठरते. 1657 साली लिहिलेल्या शहाजींच्या या पत्रात क्षत्रिय बाणा बोलून दाखविला आहे. औरंगजेब व मीरजुमन यांचे कावे ओळखले आहेत. 'शहाजीने आपले जीवन मुसलमानांच्या खिदमतीस घालवले तर शिवाजीने पूर्ण स्वातंत्र्याची पुढची पायरी गाठली'.[1] अशा प्रकारे मराठी सत्तेचा उदय, उत्कर्ष, उतरती अवस्था आणि अस्त या सर्व स्थित्यंतरांचे अतिशय मार्मिक पुराव्यासह असलेले विवेचन 'मराठी रियासती' मध्ये वाचायला मिळते. मराठ्यांच्या पराक्रमाचे, कर्तृत्वाचे, यशाचे त्याचबरोबर पराभवाचे आणि अपशयाचे इ ाानही इतिहास-वाचकांना या रियासतीमधून मिळू शकतो.

4. शिवकालीन पत्रे

काही पत्रात्मक ग्रंथ संग्रहातून मराठे शाहीतील पत्रे प्रकाशित करण्यात आले. 'आपटे-ओतूरकर' यांनी 'महाराष्ट्राचा (मराठ्यांचा) पत्ररुप इतिहास' हा पत्रात्मक संग्रह 1941 मध्ये प्रकाशित केला. शिवशाहीतील काही पत्रे स.श.देसाई यांनी 'शिवशाहीची पोर्तुगीज कागदपत्रे' या नावाने तर शिवाजी महाराजांची पत्रे प्र.न. देशपांडे यांनी 'छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे' या नावाने 1983 साली ग्रंथरुपाने प्रसिद्ध केली आहेत. या संग्रहामध्ये 203 पत्रे असून ती खाजगी व कार्यालयीन स्वरुपाची आहेत. त्यात विविध सरदार, किल्लेदार, वतनदार, कुलकर्णी इत्यादी बरोबरच आपले सावत्र भाऊ व्यंकोजी, माता जिजाबाईसही पत्रे लिहिलेली असून पत्रांच्या विषयामध्ये विविधता आढळते. त्यामधील काही पत्रे उदाहरणादाखल पुढे घेऊ-'राज्याभिषेक शकपत्रे' मध्ये स्वस्तिश्री राज्याभिशेख शके ... असा उल्लेख शिवाजी महाराजांच्या पत्रातून येऊ लागला. अशा पत्रातून महाराजांनी स्वतःचा उल्लेख 'क्षत्रिय-कुलावंतास श्री राजा शिवछत्रपती' राज्याभिषेकानंतर शिवाजी महाराजांनी पत्रलेखनासाठी स्विकारलेला 'स्वस्तिश्री' हा मायना प्राचीन काळातील शिलालेख, ताम्रपट शासनातून झालेला आढळतो. खाजगी पत्राच्या संदर्भात पत्रावरील 'श्री कारात' श्री महादेव आणि श्री कुलस्वामिनी असे शब्द आलेले आहेत. पत्राचा शेवट करताना 'बहुत काय लिहिणे तुम्ही सुज्ञ आहात', 'कळले असावे' विशेष करुन पत्राच्या शेवटच्या वाक्यानंतर मोर्तब लिहून यापुढे 'मर्यादेवं विराजते' ही समाप्ती मुद्रा उमटवलेली दिसते. यावरुन तत्कालीन पत्रलेखनच्या पद्धतीचा प्रभाव प्रस्तुत पत्रामुळे दिसून येतो. त्याचबरोबर शिवाजी महाराज म्हणजेच आपल्या रयतेची जीवापाड काळजी करणारा व रयतेविषयी कळकळ असणारा राजा होता हे या संग्रहातील अनेक पत्रामधून स्पष्ट होते. या पत्रसंग्रहामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या शेती विषयक धोरणावर आणि त्यांच्या महसूल व्यवस्थेवर प्रकाश टाकणारी पत्रे ही आहेत. उदा- 'सदरहू जमीन यास दिल्ही असे तेथे फुलझाडे व सबजी व नैशकर व केळी हर जिनस लावितील ते सुखे लाऊ देणे कुलबाब कुलकानू बाब हाए हाल व इस्तक बाल व पेस्तर जे होतील ते कुल दुमाले केले असे दुमाले करणे सनद गुमशूद जाली म्हणौनु इरकील न करणे'.[2] शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरणांविषयीचे विचार ही महत्त्वाचे ठरतात. महाराजांचे धर्मिक धोरण हे महाराजांच्या विशाल धर्मिक एकातमतेची साक्ष देणारे ठरतात. याविषयीचे पत्र उदाहरणादाखल- अस्मानी किताब म्हणजे कुराण 'ते ईश्वराची वाणी आहे. त्यात आज्ञा केली ती ईश्वर जगाचा किंवा मुसलमानाचा आहे, वाईट किंवा चांगले असो हे दोन्ही ईश्वराचे निर्मित आहे. कोठे मशीद आहे त्याचे स्मरण करुन बांग देतात, कोठे देवालय आहे, तेथे घंटा वाजवितात, त्यास कोणाचे धर्मास विरोध करणे हे आपले धर्मापासून सुरणं व ईश्वराचे लिहिले हे र÷ करुन त्यावर दोष ठेवणे आहे. याविषयी चांगले अगर वाईट जे पहावे त्यास र÷ करु नये. पदार्थची निंदा करणे हे पदार्थ करणारावर शब्द ठेवणे आहे'[3] अशा प्रकारे या पत्रसंग्रहामध्ये धार्मिक, शेतीविषयक,

न्यायव्यवस्थेवर प्रकाश टाकणाऱ्या पत्रांचा समावेश पाहावयास मिळतो.

मराठ्यांच्या पत्ररुप इतिहासाचे दर्शन महाराष्ट्राचा (मराठ्यांचा) पत्ररुप इतिहास या ---- ओतूरकर यांच्या पुस्तकातून पाहावयास मिळतो. या पत्र संग्रहात 17 व्या व 18 व्या शतकातील जवळजवळ 235 वर्षातील 250 अस्सल पत्रे व उतारे दिलेले आहेत. कौलनामा म्हणजेच 'अभयपत्र' केदारजी नाईक खोपडे हा अफजलखानास मिळाला पण त्याच्या वधानंतर राजे आपणास शिक्षा करतील म्हणून तो वतनावर परतला नाही. तेव्हा त्यास पाठविलेले हे अभयपत्र. 'प्राचीन मराठी वाङ्मय बरेच अफाट आहे. कित्येक पत्रे साहित्य-गुणांनी नटलेली आहेत. काहीतून तत्कालीन, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा बोध होतो. व्यक्तिदर्शन घडविण्याचे सामर्थ्यही काही पत्रामध्ये असते. समकालीन घटना ही मूर्मिमंत उभ्या करण्याचे कसबही काही पत्रातून दिसून येते. समकालीन इतिहासातले तुटलेले धागेदोरे साधणारी काही पत्रे आहेत. ऐतिहासिक कागदपत्रात अनेक प्रकार आढळतात. शासकीय, पत्रव्यवहार, निवाडे, महजर कौलनामे, वाटपपत्रे, शुद्धिपत्रे, दानपत्रे व बक्षिसपत्रे असे प्रकार सांगता येतील. शासनाची संबंधित असलेल्या कागदपत्रांचे 78 प्रकार असल्याची नोंद इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी दिली आहे. याशिवाय कौटुंबिक पत्रव्यवहार, आश्रितांनी लिहिलेली पत्रे, वार्तापत्रे असे कितीतरी प्रकार पत्र वाङ्मयाचे आहेत.''[4]

5. ताराबाई कालीन कागदपत्रे

'ताराबाई कालीन कागदपत्रे' खंड 1,2,3 या ग्रंथावरुन ताराबाईच्या कारकिर्दीचा आढावा घेता येतो. ताराबाई कालीन कागदपत्रे तीन खंडामध्ये आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासातील एका स्त्रीच्या कारकिर्दीवर या पत्रांमुळे प्रकाश पडतो व त्याचबरोबर राजकीय, धार्मिक, सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा अंदाज येतो. महाराणी ताराबाई ह्या धार्मिक वृत्तीच्या होत्या हे त्याच्या पत्र संग्रहावरुन स्पष्ट होते. 'महाराणी ताराबाई यांनी पालीच्या खंडोबाच्या जत्रेतील ऐवजा संबंधी गिरजोजी यादव यांना पत्र लिहिले आहे. त्या पत्रावरुन त्या धार्मिक वृत्तीच्या होत्या हे लक्षात येते. ताराबाई ह्या धार्मिक प्रवृत्तीबरोबरच पराक्रमी देखील होत्या. त्यांच्या पराक्रमाची साक्ष पटण्यासाठी पराक्रमी कारकिर्दीचे गुणगान कवी देवदत्त यांनी यशोचित शब्दांत केले आहे'.[5] 'गोव्याच्या व्हाईसरॉयने आपल्या राजास जे पत्र पाठविले त्यात गोव्याच्या ह÷ीपार मराठ्यांच्या राणीचे सैन्य मोठ्या प्रमाणात गोळा झाले आहे असे म्हटले आहे. त्या पत्रातील मराठ्यांच्या सैन्यासंबंधीचा उताराही या कागदपत्रामध्ये मिळतो'.[6] पोर्तुगीज आणि संभाजी दुसरे यांच्यामध्ये झालेल्या तहाचे वर्णन करणारे कागदपत्र या खंडामध्ये आढळतात.

ताराबाईकालीन खंड-2 मध्ये सर्वात महत्त्वाचा असा कागद म्हणजे रामचंद्र पंत अमात्य यांच्या मिळकतीचे विभागणी पत्र होय. 'रामचंद्रपंत अमात्य यांच्या मृत्यूनंतर त्यांचे तीन पुत्र भगवंतराव, अप्पाजीराव व शिवराम या तिघांमध्ये केलेले मिळकतीचे विभाजन होय'.[7] प्रस्तुत खंडामध्ये काही महजर म्हणजेच निवाडपत्रे ही दिली आहेत. मौजे बाविडे या गावच्या पाटीलकीबाबत सरकारात पैसा भरावयाचा होता. या पाटीलकीचे हिस्सेदार नरोजी, जोतजी, मेसाजी पवार यांना सदहू रकमेचा फाळा भरणे अशक्य झाल्याने त्यांनी आपल्या पाटीलकीचा हिस्सा विकावयास काढला. त्यांनी प्रथम हा हिस्सा आपल्या भाऊबंदांना घेण्याची विनंती केली पण त्यांच्याकडून नकार मिळाल्याने त्यांनी तो द्वारकोजी यादव यास विकला. यासंबंधीचे उल्लेख असणारे पत्रही या खंडात पाहावयास मिळते. श्री करवीर क्षेत्र हे महालक्ष्मीचे अनादि वास्तव्य स्थान होते, परंतु धामधुमीच्या काळामध्ये देवालय सोडून देवीचे मुर्तीस एका पुजाऱ्याच्या घरी ठेवण्यात आले. देवीने स्वस्थळी बसण्याचा साक्षात्कार दिला. तेव्हा मूर्तीची स्थापना

देवालयात करण्यासाठीची आज्ञा छत्रपती संभाजी दुसरे यांनी सिंदोजी हिंदुराव घोरपडे यांना केली. आज्ञेप्रमाणेच त्यांनी मूर्तीची स्थापना केली. देवीच्या पारपत्याचे प्रधानत्वांचा अधिकार छत्रपती यांनी नरहर भट सावगावकर यांना दिला. त्यावेळी दिलेले हे आज्ञापत्र यामध्ये समाविष्ट असल्याचे पाहावयास मिळते. 'श्री म्हणजे अनादिस्थ पुराण प्रसिद्ध जागृत येक काशी क्षेत्र की करवीर यापेक्षा दुसरे स्थल विशेष आहे यैसे नाही. या स्थली विध पुरस्कार पूजा उत्साह जालियाने स्वामीस व स्वामीच्या राज्यास बहुत कल्याणवह असे जाणून तुम्ही बहुत थोर वेदशास्त्र संपन्न कर्मनिष्ठ श्रींच्या पूजेचे शास्त्र मर्यादा जाणत नाही'.[8] गोव्याच्या व्हाइसरॉयने साष्टीच्या सेनापतीस लिहिलेल्या या पत्रात 'बाजीरावाच्या सैन्याच्या हालचालींची माहिती असून करवीरच्या सैन्याच्या संभाव्य हालचालींबाबत काळजी घेण्यासाठी काही सूचना करण्यात आल्या आहेत असे सूचना करणारे पत्र हा या खंडात महत्वाचे ठरते'.[9]

ताराबाईकालीन खंड-3 मध्ये असलेल्या कागदपत्रांमध्ये राजकारणाच्या दृष्टीने दोन महत्वाच्या घटनांचा उल्लेख येतो. त्या म्हणजे शाहू महाराजानंतर रामराजाचे राज्यारोहण आणि महाराणी ताराबाई व नानासाहेब पेशवे यांच्यातील संघर्ष ह्या होते. शाहू महाराज निधन पावल्यानंतर मुलूखात सर्वत्र अंदाधुंदी माजली आहे. किल्ला कर्ज वाम काढून हजार पाचशे प्यादे व हजार स्वार ठेवून ताब्यात ठेवला, परंतु परिस्थिती हाताबाहेर गेली आहे. तरी शिवंदीची व्यवस्था करावी म्हणून शिवाजी साळोखे यांचे ताराबाईंना पत्रात,'महाराजांनी कैलासवास केल्यापासून मुलकात डोहाणा होऊन प्रांत खराब जाहला. किल्ल्यास वेध बहुतांचे लागले. सेवकाचे हातचे पदरीचे कर्म वाम व जेथवरी हात पावले तेथवरी यत्न करुन तेंथवरी मिळऊन.. किलाचा हिसोब लिहून राजश्री राघे अनंत याबरोबर सेवेसी लिहून पाठविला आहे.. तदनुरुप साहेबी सेवकाची बेगमी सिबंदी सारे अर्ती केली. या सेवक ज्याप्रमाणे आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तुणूक करील. सेवकापासून तिळतूल्य अंतर होणार नाही.. '[10] त्याकाळी वाहतूक करणे सोपे नव्हते याचाही उल्लेख येथे आलेला आहे. ताराबाई यांना करवीरच्या जिजाबाईंनी लिहिलेले पत्र याचा उल्लेख येथे महत्त्वाचा ठरतो. चिरंजीव सौभग्य दिसंपन्न जिजाबाई याप्रति महाराज मातुश्री आईसाहेब अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल..साहेबाचा वंश असता तोतया करुन डाग लाऊन घ्यावा हे प्रथम दिवसापासून साहेब म्हणतात. त्याप्रमाणे तुम्हास आज्ञा करीत असता धैर्य न होय आणि प्रति उत्तरे मात्र येतात. हा विषय क्षेत्रिय कुलवंतास आहेत त्यात उचित नसे.. तरी आपले चिताचे कल्पविकल्प दूर करुन समयोचित येऊन पोचलियाने उत्तम आहे.. ''[11] ताराबाई या 82 वर्षेच्या होऊन वारल्या आणि अखेरपर्यंत कारभार पहात होत्या हे त्यांच्या मृत्यूपूर्वी सात दिवस त्यांनी सनद दिलेली आहे यावरुन ते स्पष्ट होते.

6. जिजाबाईकालीन कागदपत्रे

जिजाबाई आणि ताराबाई यांचा काही काळ संबंध आलेला आहे. त्यासंदर्भातील काही कागदपत्रे ताराबाई कालीन कागदपत्र खंड -3 मध्ये येतात. यावरुन दोघींमधील सलोखा दिसून येतो. ताराबाई आणि जिजाबाई ह्या दोघींनी एकमेकींना पत्र पाठविलेली आहे. जिजाबाईच्या कागदपत्रांमध्ये साधारणपणे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक अशा स्वरुपाची पत्रे आहेत. पुढील पत्र हे राजकीय अर्थाने महत्त्वाचे ठरते. या पत्रात महाराणी जिजाबाईंनी 'रघुनाथरावांचा' ठावठिकाणा व मनसुबा याबाबत पूच्छा केली असून हिंदूस्थातात बखेडा निर्माण झाला असल्याची बातमी आहे. तरी रघुनाथराव तिथल्या बंदोबस्तास जातीने जाणार की आणखी कुणाला पाठविणार ते कळविण्यास सांगितले आहे. यावरुन जिजाबाईंना उत्तरेकडील घडामोडींची आस्था असल्याचे स्पष्ट होते.''[12] मेसाई देवीवर

महाराणी जिजाबाई यांची भक्ती होती. हे देखील या खंडातील आलेल्या पत्रावरुन दिसून येते. यावरुन त्यांची वृत्ती धर्मिक होती हे स्पष्ट होते. जिजाबाईंनी गंगीकडे मेसाई देवीचा प्रसाद पाठवून तो महाराजांना वाड्यातील सर्व स्त्रियांना नोकरांना आणि कोट करवीरच्या मामलेदारास आणि त्यांच्या हाताखालच्या लोकांना देण्यास सांगितलेले होते. ती सर्व हकीकत गंगीने पत्रोत्तरी सांगितली आहे. तसेच पुढे 'चार्लस ब्रुम' याने जिजाबाईंना पाठविलेल्या पत्रामध्ये ईस्ट-इंडिया कंपनी व करवीर राज्य यांच्या मधल्या संबंधाबाबतचे असावे. पत्राचा विषय मैत्रीच्या करारासंबंधीचा असावा असे प्रस्तुत कागदपत्रांमध्ये केवळ आर्थिक व्यवहारासंबंधीचीच कागदपत्रे नाहीत. जी आहेत ती प्रदीर्घ स्वरुपाची आहेत. या सर्व संग्रहातील पत्रांवरुन तत्कालीन सामाजिक,आर्थिक, राजकीय, ऐतिहासिक, सांस्कृतिक परिस्थिती बरोबरच मराठ्यांच्या इतिहासाचा परिचय घडतो. शिवाय ही सर्व पत्रे ऐतिहासिक पुराव्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतात. ही पत्रे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. 'मराठीतील उपलब्ध असणारा पत्रव्यवहार --- आहे. ऐतिहासिक प्रामाण्यापेक्षाही ही पत्रे अधिक प्रमाण मानली पाहिजेत. थोड्या शब्दात अधिक आशय खाचाखोचांसह समर्थपणे आणि तितक्याच सफाईदारपणे व्यक्त करण्याचे पत्रलेखकाचे कौशल्य आणि मराठी भाषेतील लेखनाचे एक वेगळेच वळण या पत्रातून दिसून येते. शिवाय या लेखनाला पत्रलेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा गडद स्पर्श आहे. राष्ट्राच्या जीवनात ज्याच्या जीवनाचे धागेदारे गुंतलेले होते अशांचे अंतरंग या पत्रातून व्यक्त झाले आहे.'[13] म्हणून ही पत्रे महत्त्वपूर्ण ठरतात.

7. बखर वाङ्मय

साहित्यामधील प्रवाहांचा हे योगायोगाने अस्तित्वात होत नाहीत. काळाच्या प्रवाहात समाजाची गरज भागविण्यासाठी किंवा परिस्थितीस वळण देण्याच्या हेतूने विशिष्ट प्रवाह निर्माण होत असतो. बखर हा मराठी साहित्यातील प्रकार तवारिखा, अखबार, शाहनामे इ. फारसी भाषेतील साहित्याशी सदृश्य आहे. 'ऐतिहासिक संशोधनातून कागदपत्रांच्या बरोबर बखरी ही उजेडात आल्या. ह्या बखरी पत्ररुपाने सादर होत असत. बखर साहित्यामध्ये ऐतिहासिक प्रसंग, घटना, वार्ता, वंशावळी, राजकारभार विषयक वर्णन, चरित्रे इत्यादींचा समावेश बखरींमध्ये होतो. पत्र वाङ्मयाचा आणि बखर वाङ्मयाचा अनन्यसाधारण महत्त्व संबंध आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही'.[14] 'महाराष्ट्र सारस्वत खंड-2' मध्ये मराठेशाहीतील ऐतिहासिक पत्रव्यवहार हा ही खरोखर प्राचीन गद्याचा एक उत्कृष्ट नमुना असून तो उपलब्ध करुन देण्याचे काम आजवर अनेक मातब्बर संशोधकाचे जीवित श्रम खर्चित पडले आहेत. ही पत्रे म्हणजे खरोखरच त्या लेखकाचे अंतरचरित्रच होय. इतकी त्यातील काही साहित्यदृष्ट्या सरस आहेत. शिवाजी महाराजांनी जो स्वराज्याचा वृक्ष लावला तो पुढे शे-सव्वाशे वर्षे पावेतो चांगलाच फोफावला. महाराष्ट्राचे महत्तर राष्ट्र या काळात झाले व सर्वत्र महाराष्ट्राचा वचक बसला. त्या काळातील बाजीपंत नाना, बाजीराव, नानासाहेब, हरिपंत तात्या, भाऊसाहेब, चिमाजी आप्पा, नाना फडणवीस, शिंदे, होळकर, गायकवाड, रघुनाथदादा, गोपिकाबाई, आनंदीबाई इ. शेकडो वीर मुत्स÷यांची हजारो पत्रे मिळाली असून त्यांचे पाचपन्नास खंड छापूनही निघाले आहेत. ही पत्रे वाचून पाहता फारसी भाषा पचवून संस्कृताभिमुख होऊन आमचे वरी मुत्स÷ी, डौलदार व घाटदार भाषा लिहू लागले. याचा प्रत्यय येतो. त्याविषयी पोतदार म्हणतात, 'स्वराज्याचे साम्राज्य झाले ! व्यवहार अफाट झाला. राजकारणे दाही दिशास खेळू लागली! त्यामुळे वाणीला वैभवाचे तेज चढले ! तिला विलासाची चटक लागली व ती अधिक नटवी, लज्जतदार व प्रौढ झाली. चिमाजी आप्पा, नाना फडणवीस इत्यादींची पत्रे, खलिते वाचताना युरोपियन मुत्स÷यांच्या 'डिस्पॅचेसची'

आठवण होते.'[15] या वीरांच्या पत्रांमधून जिवंत साहित्याचा अनुभव वाचकांना पदोपदी येताना दिसतो.

8. ख्रिस्ती वाङ्मय

महाराष्ट्रातील लोकांना नुकतीच अक्षर ओळख होते होती तो पर्यत ख्रिस्ती धर्म प्रसाराचं वाङ्मय आले. भारत देशातील अज्ञान दूर व्हावे, त्यांच्या मनामध्ये ख्रिस्ती धर्माविषयी निष्ठा निर्माण व्हावी, त्यांनी आपला धर्म स्विकारावा हे उद्दिष्ट समोर ठेवून, निष्ठावान ख्रिस्ती मिशनऱ्यांनी मराठी भाषेचा वापर करुन कोश वाङ्मय, चरित्रे लिहिली. छापखाना व मराठी शाळा सुरु केल्या. मराठीतील 'बाळबोध मेळा' सारखी मासिके सुरु केली. वृत्तपत्रे, दवाखाने, अनाथालये यांची निर्मितीस सुरुवात केली. प्रार्थना गीते, व्यावहारिक, मनोरंजनात्मक साहित्य निर्माण झाले. त्यांचा दृष्टिकोन वरवर दया, माणूसकीचा व अंतर्गत धर्मप्रसाराचा होता. बरेच लोक या धर्माचे तत्वज्ञान वाचू लागले. धर्म बदलू लागले. बहुतांश समाज ख्रिस्ती धर्माच्या प्रचाराचा जुलूम सहन करीत होता. त्यासाठी तो कर्मकांडाच्या पाठीमागे लागला होता.

9. अव्वल इंग्रजी कालखंड

अव्वल इंग्रजी कालखंडात पत्रात्मक साहित्याचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. याच काळात मुद्रणकलेचा प्रारंभ झाल्यामुळे व देशातील शिक्षणाचे प्रमाण वाढू लागले. त्याचबरोबर संशोधन व संकलनाची आवड निर्माण झाली. त्यातूनच पूर्वीच्या राजे-राजवाड्यांच्या, सरदारांच्या पत्रांचे संपादन करुन त्यांचे ग्रंथ प्रकाशित करण्यात येऊ लागले. इतिहासाचे, संस्कृतीचे (विषयीचे) संशोधन करीत असतानाच पूर्वीच्या महत्त्वाच्या व्यक्तींची जी काही पत्रे उपलब्ध झाली ती सर्व ग्रंथरुपाने प्रसिद्ध केली गेली. मराठी पत्रात्मक साहित्यात अशा पत्रात्मक ग्रंथ-संग्रहाची संख्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. अव्वल इंग्रजी कालखंडात व त्यापूर्वी लिहिण्यात आलेल्या अनेक समाजसुधारकांची राजकीय मंडळींची इंग्रज अधिकाऱ्यांची विविध राजे-महाराजे, सरदार, साहित्यिक, विचारवंत तत्ववेत्ते, रियासतदार इत्यादींची पत्रे संकलीत करुन ग्रंथरुपाने प्रसिद्ध करण्यात आली. त्याद्वारे तत्कालीन राजकीय, समाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला गेला तर काही पत्रातून ऐतिहासिक व्यक्तीच्या चरित्राचा, घराणेशाहीचा व त्याच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांचा अर्थ लावण्याचा व त्यांच्यातील सत्यासत्यता पडताळून पाहण्याचा प्रयत्न केला गेला. ऐतिहासिक दस्ताऐवज, ऐतिहासिक पुरावे म्हणून या पत्रातून पाहण्यात आले. अशा पत्रात्मक संग्रहाची संख्या मराठीत मोठ्या प्रमाणात आढळते.

'मराठी पत्रसाहित्य' एका अर्थाने विश्वरुप दर्शनच म्हणावे लागेल. कृमीकीटकांपासून ते श्रेष्ठ अशा धनुर्धरापर्यंत सर्वांचाच अंतर्भाव विश्वरुपात अर्जुनाला दिसून आला. त्याप्रमाणेच अगदी सनद्दी कागदापासून ते साहित्य गुणाने अलंकृत झालेल्या लेखपर्यंत नानाविध सामग्री या साहित्यात आढळते. एका अर्थने या साहित्यास कल्पवृक्षही म्हणावयास हरकत नाही. 'मानवी स्वभावाची कितीतरी विविध चित्रे यात सापडतील. समाजकारण, राजकारण, धर्मकारण, विशेषकारण अशी अनेक कारणे या पत्र समुहात दिसून येतात.'[16] बखरी व पत्रव्यवहार यातील गद्याने राजकीय व्यवहार एवढेच कार्यक्षेत्र व्यापलेले दिसते. त्यामुळे प्राचीन गद्याची वाढ एकांगी झाली. व्यापाराची अभिवृद्धी किंवा विज्ञानाची ओळख या दोन कार्यक्षेत्राकडे मराठ्यांचे लक्ष नसल्यामुळे मध्ययुगीन काळात मराठी गद्याचा सर्वांगीण विकास होवू शकला नाही. एवढेच खरे की या पत्रव्यवहारात तत्कालीन महाराष्ट्राचे अंतःकरण ज्वलंत स्वरुपात प्रकट झाले आहे. म्हणून हा ऐतिहासिक पत्रव्यवहार महाराष्ट्राच्या इतिहासाचा अमोलिक ठेवा आहे. मात्र स्वराज्याच्या दीडशे वर्षात जो विपुल पत्रव्यवहार

झाला तो एकोणिसाव्या शतकातील अखेरच्या दशकापर्यंत दप्तरांतच धूळ खात पडला. अव्वल इंग्रजीतील गद्याला त्याचा काहीच उपयोग झाला नाही. प्राचीन मराठी पत्रव्यवहाराची संख्या जवळ-जवळ चाळीस ते पन्नास हजार इतकी असल्याचे दिसते.

10. भाषांतरीत वाङ्मय

इंग्रजी राजवटीत शिक्षणाचा प्रचार व प्रसार झाला. त्यामुळे शिकलेला वर्ग हा बहुतांशी इंग्रजी पुस्तकांचे भाषांतर करण्यातच अधिक रंगून गेला. त्यांनी भाषांतर करण्यावरच अधिक भर दिला. त्याच बरोबर समाजामध्ये वैचारिक व धार्मिक प्रबोधन होत राहिले. पोथ्या, पुराणे, महात्मे, आरत्या, स्त्रोत्रे, जुने धार्मिक ग्रंथ, संस्कृत ग्रंथांची भाषांतरे, इंग्रजी ग्रंथांची भाषांतरे मराठीत झाली. हे सर्व मुद्रण कलेमुळे सोयीचे झाले. 1854 मध्ये बाबा पद्मनजी यांनी 'यमुना पर्यटन' ही कादंबरी लिहिली. ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करुन ख्रिस्ती वाङ्मय लिहिले. त्यांनी 100 हून अधिक पुस्तके लिहिली. पण त्यांच्या 'यमुना पर्यटन' यास मराठीतील पहिल्या कादंबरीचा मान मिळाला नाही. तो हळबे यांच्या 'मुक्तामालेस' मिळाला. याच काळात काही चरित्र ग्रंथ लिहिले गेले. सॉक्रेटिसचा इतिहास, वॉशिंगटनचा इतिहास, दादोबा पांडुरंग यांचे आत्मचरित्र, काही घराण्यांचे इतिहास लिहिला गेला. या काळातील वाङ्मय प्रामुख्याने भाषांतरीत व अनुवादीत आहे. असा हा एक काळ भाषांतराचा निर्माण झाला.

एकंदरच मराठी वाङ्मयाचा इतिहासावरुन पत्रवाङ्मयाची जी निर्मिती पाहिली त्याचे स्वरुप हे विविधतेने नटलेले दिसून येते पण 'पत्र' हा वाङ्मय प्रकार त्याचे प्राचीन स्वरुप ही अत्यंत विस्तृत आहे व अर्वाचिन पत्र वाङ्मयाचे स्वरुपही विस्तृत आहे हे स्पष्ट होते.

निष्कर्ष-

1. पत्रात्मक साहित्य हा एक आत्मनिवेदनपर अविष्कार असतो.
2. प्रेम व्यक्त करण्यासाठी, कधी विचाराच्या प्रकटीकरणासाठी, तत्वज्ञान सांगण्यासाठी, कधी आठवणी व्यक्त करण्यासाठी तर कधी मन मोकळे करण्यासाठी पत्रलेखन केले जाते.
3. पत्रात्मक वाङ्मयाला जरी फार प्राचीन परंपरा लाभली असली तरी, पत्रात्मक तंत्राचा वापर करुन कथा, कादंबऱ्या फार उशिरा लिहिल्या गेल्या आहेत.
4. मराठ्यांच्या पराक्रमाचे, कर्तृत्वाचे, यशाचे त्याचबरोबर पराभवाचे आणि अपशयाचे ज्ञानही इतिहास-वाचकांना या रियासतीमधून मिळते.
5. अव्वल इंग्रजी कालखंडात व त्यापूर्वी लिहिण्यात आलेल्या अनेक समाजसुधारकांची, राजकीय मंडळींची, इंग्रज अधिकाऱ्यांची, विविध राजे-महाराजे, सरदार, साहित्यिक, विचारवंत तत्ववेत्ते, रियासतदार इत्यादींची पत्रे संकलीत करुन ग्रंथरुपाने प्रसिद्ध करण्यात आली.
6. मराठी सत्तेचा उदय, उत्कर्ष, उतरती अवस्था आणि अस्त या सर्व स्थित्यंतरांचे अतिशय मार्मिक पुराव्यासह असलेले विवेचन 'मराठी रियासती' मध्ये वाचायला मिळते.
7. जिजाबाईकालीन कागदपत्रे सामाजिक, आर्थिक, राजकीय, ऐतिहासिक, सांस्कृतिक परिस्थिती बरोबरच मराठ्यांच्या इतिहासाचा परिचय घडतो. शिवाय ही सर्व पत्रे ऐतिहासिक पुराव्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतात.

संदर्भ ग्रंथ

1. देशमुख गो.स.,'मराठी रियासती (खंड-1)', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. तृतीय आवृत्ती-1935. पृष्ठ क्र.110 ते 112

2. देशपांडे प्र.न.,'छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे' ,सुषमा प्रकाशन, धुळे, आवृत्ती पहिली 1983, पृ.16
3. तत्रैव, पृष्ठ क्र.27
4. कुलकर्णी श्री.र.,'प्राचीन मराठी गद्य प्रेरणा आणि परंपरा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीय आवृत्ती 1991. पृष्ठ क्र.135-140
5. पवार अप्पासाहेब (संपा),'ताराबाईकालीन कागदपत्रे' खंड 1,श्री.सिध्देश्वर पिटींग प्रेस, कोल्हापूर आवृत्ती पहिली 1969, पृष्ठ क्र.8-11
6. तत्रैव, पृष्ठ क्र. 340-341
7. पवार अप्पासाहेब, 'ताराबाईकालीन कागदपत्रे' खंड 2, श्री.सिध्देश्वर पिटींग प्रेस, कोल्हापूर.आवृत्ती पहिली 1970. पृष्ठ क्र.21-22
8. तत्रैव, पृष्ठ क्र.38
9. तत्रैव, पृष्ठ क्र.64-65
10. पवार अप्पासाहेब, 'ताराबाईकालीन कागदपत्रे' खंड 3, श्री.सिध्देश्वर पिटींग प्रेस, कोल्हापूर, आवृत्ती पहिली 1972. पृष्ठ क्र.59
11. तत्रैव, पृष्ठ क्र.162
12. पवार अप्पासाहेब,'जिजाबाईकालीन कागदपत्रे', श्री.सिध्देश्वर पिटींग प्रेस, कोल्हापूर. आवृत्ती पहिली 1978. पृष्ठ क्र.72
13.नासिराबादकर ल.रा.,'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास',फडके प्रकाशन, कोल्हापूर आवृत्ती आठवी 2005. पृष्ठ क्र. 309
14. कुलकर्णी श्री.रं.,'प्राचीन मराठी गद्य प्रेरणा आणि परंपरा', उनि पृष्ठ क्र.86-90
15. भावे वि.ल.,'महाराष्ट्र सारस्वत' खंड 2,पॉप्युलर प्रकाशन, आवृत्ती सहावी, 1905/1983. पृष्ठ क्र.1004
16. कुलकर्णी श्री.रं.,'प्राचीन मराठी गद्य प्रेरणा आणि परंपरा', उनि पृ.क्र.147-148
17. शेणोलीकर ह.श्री.,'प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरुप', मोघे प्रकाशन, कोल्हापूर. आवृत्ती सहावी 1987. पृष्ठ क्र.295
17. जोशी प्र.ना.,'मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास', प्रसाद प्रकाशन, पुणे. आवृत्ती पाचवी, 1972. पृष्ठ क्र.23-25
19. जोशी प्र.न.,'मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास', प्रसाद प्रकाशन, पुणे. उनि पृष्ठ क्र.465-469
20. कानिटकर काशिबाई, (प्रस्तावना), 'हरिभाऊंची पत्रे', ऐक्य संपादन मंडळ, सातारा. पृष्ठ क्र.1